# अन्न उत्पादनातील दर्जा नियंत्रण कायदे व मानके

डॉ. अश्विनी मुखेकर
सहाय्यक प्राध्यापिका (पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग)
डॉ. डी. वाय. पाटील कृषी महाविद्यालय, तळसंदे

हव्या असलेल्या गोष्टींची पूर्तता, उत्पादनाची सर्व वैशिष्ट्यांच्या बाबतीत समृद्धता, ग्राहकाचे समाधान करण्याची क्षमता किंवा काही वेळात समाधान करणाऱ्या घटकांपेक्षाही जास्त घटक पुरविणे या गोष्टीला दर्जा टिकविणे असे म्हणता येईल. अन्न ही जीवनातील एक महत्वाची गरज असून, स्वच्छ, शुद्ध व पोषक अन्न ही ग्राहकाची आवश्यकता असते. परंतु जास्त नफा कमविण्यासाठी काही वेळा अन्नामध्ये भेसळ करून ग्राहकांना फसविण्याचे प्रकार घडतात. त्यामुळे काही वेळा ग्राहकाच्या आरोग्याला व जीविताला‌ही धोका पोहचू शकतो. हे थांबविण्यासाठी शासनातर्फे विविध कायदे व मानकांची तरतूद करण्यात आली आहे.

### भेसळ प्रतिबंधक कायदा (PFA- प्रिव्हेंशन ऑफ फूड ॲडल्टरेशन ॲक्ट):

१ जून १९७५ पासून अन्नभेसळ प्रतिबंधक कायद्याची सुरुवात होऊन त्याद्वारे कोणीही उदाहरणार्थ, प्रक्रिया करणारा, विकणारा, साठविणारा, वितरण करणारा जर अन्नामध्ये भेसळ करत असेल तर त्याला प्रतिबंध करता येतो. या कायद्यानुसार अन्न म्हणजे पाणी व औषधे सोडून कोणतीही अशी गोष्ट की जी कोणत्याही माणसाला खाता अथवा पिता येईल किंवा ज्याचा वापर अन्नामध्ये मसाला किंवा सुगंधी द्रव्य म्हणून करता येईल किंवा ज्या वस्तूचा अन्न म्हणून केंद्र सकारने प्रसिद्ध केलेल्या गॅझेटमध्ये अंतर्भाव केलेला आहे अशी वस्तू. केंद्र शासनाने अन्नाची मानके ठरविण्यासाठी सेंट्रल कमिटी फॉर फूड स्टॅन्डर्ड (CCFS) ची स्थापना केली आहे. ही समिती केंद्र सरकारला व राज्य सरकारला वरील कायद्यासंदर्भात आवश्यक तो सल्ला देतो. केंद्र सरकार या समितीशी सल्लामसलत करून खालील बाबतीत विविध नियम बनविते.

- आयातीसाठी परवानाप्राप्त अन्न व अन्नाचे वर्ग कोणते असावे हे ठरविणे.
- अन्नाच्या कोणत्याही वर्गामध्ये दर्जाची मानके व दर्जामध्ये जास्तीत जास्त किती फरक होऊ शकतो हे ठरविणे.
- कोणतेही अन्नपदार्थ अथवा अन्नपदार्थांचा गट उत्पादित, वितरित व अंतिम विक्री करण्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विशिष्ट रचना निर्माण करणे.
- कोणत्याही अन्नपदार्थाचे पॅकिंग व लेबलिंग तसेच त्याच्या डिझाईनवर नियंत्रण ठेवणे की ज्यामुळे ग्राहकाची अन्नपदार्थाचा दर्जा व वजन याबाबत दिशाभूल होणार नाही. या कायद्याच्या अंतर्गत विविध नियम असून त्याद्वारे अन्नपदार्थांबाबत विविध घटकांची पूर्तता केली जाते.

### फ्रुट प्रॉडक्ट्स ऑर्डर (FPO):

१९५५ च्या अत्यावश्यक वस्तू कायद्यांतर्गत याचा वापर विविध फळे व भाजीपाल्यांच्या पदार्थांसाठी केला जातो. या अंतर्गत कोणत्याही व्यक्तीला परवान्याव्यतिरिक्त फळे व भाज्यांचे पदार्थ विक्री करता येत नाहीत. तसेच उत्पादकाला पॅकिंग, मार्किंग, लेबलिंग करताना या कायद्याअंतर्गत सुचविलेल्या बाबींची पूर्तता करावी लागते. तसेच याच्या दुसऱ्यां भागांमध्ये असलेल्या प्रमाणकांप्रमाणे फळांचे रस, पल्प, कॉन्सन्ट्रेट, स्क्वॅश, कॉर्डियल, सिरप, नेक्टर, हवायुक्त पाणी असलेले फळांचे रस व रेडी टू सर्व्ह अशी पेये तयार करण्यासाठी दिलेल्या प्रक्रिया पद्धती वापराव्या लागतात. तसचे या पदार्थांमध्ये वापरले जाणारे प्रिझर्व्हेटिव किती असावे याचेही प्रमाण ठरवून दिलेले आहे.

### भारतीय मानकांच्या संदर्भातील कायद्यांचा ब्यूरो (BIS):

या कायद्यानुसार पदार्थांचे प्रमाणीकरण, मार्किंग व दर्जा प्रमाणीकरण व या संदर्भातील अन्य गोष्टींची सुसूत्रता ठेवण्याचे काम ब्यूरोमार्फत केले जाते. ही योजना स्वयंप्रेरित असल्याने ज्याच्याकडे पुरेशी चाचणी सुविधा उपलब्ध आहे अशी उत्पादक व्यक्ती परवान्यासाठी अर्ज करू शकते. यामुळे विविध क्षेत्रांमध्ये खालील फायदे मिळू शकतात.

#### उत्पादकांसाठी:

१) उत्पादनप्रक्रियेतील टप्पे ठरवून दर्शनियंत्रण संरचना राबविणे. २) BIS च्या दर्जानियंत्रण रचनेतून वेगळे स्वतंत्र ऑडिट करणे. ३) प्रमाणीकरणामुळे होणारा आर्थिक फायदा मिळतो. ४) देशविदेशाच्या बाजारात चांगली प्रतिमा निर्माण होते. ५) होलसेलर, रिटेलर व स्टॉकिस्ट तसेच ग्राहकांना उच्च दर्जाने जिंकता येते. ६) केंद्र व राज्य सरकारी, स्थानिक संस्था, खाजगी व पब्लिक सेक्टरमधील संस्था, इत्यादींद्वारा मोठ्या प्रमाणावर खरेदी होऊन चांगला लाभ होऊ शकतो.

#### ग्राहकांसाठी:

१) मालाच्या दर्जाबाबतीत खात्री असते. २) उत्तम उत्पादन निवडण्यात मदत होते. ३) प्रमाणित पदार्थामध्ये जर कमी दर्जाचा पदार्थ आढळला तर त्याबदली दुसरा पदार्थ मिळू शकतो. ४) सदर विषयामध्ये ग्राहकाची फसवणूक थांबते. तसेच त्याच्या आरोग्य व संपत्तीला संरक्षण मिळते.

### कृषिमाल (प्रतवारी व मार्किंग) कायदा (AGMARK):

मालाची प्रतवारी व मार्किंग संदर्भात हा कायदा आहे. या कायद्याला पूरक अशा मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्ट ऑर्डर, मीट अँड मीट प्रॉडक्ट ऑर्डर, खाद्य तेले पॅकिंजिंग ऑर्डर, तान्ह्या बालकांसाठी दुधाऐवजीच्या पदार्थांचा कायदा असे कायदे आहे.

★ ★ ★

(संपर्क: +९१ )